# मुंबई बंदर विश्वस्त मंडळ वर्ग एक

# कर्मचारी (सेवानिवृत्ती नंतर नोकरीची स्वीकृती)

# विनियम, १९७५

---

**(३०जून १९८२ पर्यंत सुधारित)**

## मुंबई बंदर विश्वस्तमंडळ वर्ग एक
## कर्मचारी (सेवानिवृत्तीनंतर नोकरीची स्वीकृती)
## विनियम, १९७५.

---


| विनिमय | विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त शीर्षक व प्रारंभ | ... | ... | ३ |
| २. | प्रयुक्ती | ... | ... | ३ |
| ३. | व्याख्या | ... | ... | ३-४ |
| ४. | भारतातील वाणिज्यिक नोकरी | ... | ... | ५ |
| ५. | पुन्हा सेवेत घेतलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत दोन वर्षाच्या कालावधीची गणना | ... | ... | ६ |
| ६. | भारताबाहेर एखाद्या शासनात सेवा - निवृत्तीनंतरची नोकरी | ... | ... | ६ |
| ७. | वर्ग एकच्या पदावर स्थानापन्न असलेल्या कर्मचाऱ्यांकरिता देखील परवानगी आवश्यक | ... | ... | ७ |
| ८. | स्पष्टीकरण | ... | ... | ७ |
| ९. | निरसन आणि व्यवृत्ती | ... | ... | ७ |
| | जोडपत्र | | | ८ - ९ |
| | अभिवचन पत्राचा नमुना एक | | | १० |
| | अभिवचन पत्राचा नमुना दोन | | | ११ |

# मुंबई बंदर विश्वस्त मंडळ वर्ग एक
# कर्मचारी (सेवानिवृत्तीनंतर नोकरीची स्वीकृती)
# विनियम, १९७५.

मुख्य बंदर विश्वस्तमंडळ अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३८ ) याच्या कलम २८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, आणि सदर विषयासंबंधातील विद्यमान विनियमांचे अधिक्रमण करून, मुंबई बंदर विश्वस्त मंडळ, उक्त अधिनियमाच्या कलम १२४ च्या पोट कलम (१) द्वारे अपेक्षित असल्याप्रमाणे केंद्र सरकारच्या अनुमतीने याद्वारे पुढील अधिनियम तयार करीत असून सदर विनियम, उक्त कलम १२४ च्या पोटकलम (२) अन्वये अपेक्षित असल्याप्रमाणे शासन राजपत्राच्या दोन लागोपाठच्या अंकांत यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत, ते पुढीलप्रमाणे:

१. **संक्षिप्त शीर्षक व प्रारंभ -**

(१) या विनियमांना, मुंबई बंदर विश्वस्तमंडळ वर्ग एक कर्मचारी (सेवानिवृत्तीनंतर नोकरीची स्वीकृती) विनियम, १९७५, असे संबोधण्यात येईल.[१]

(२) हे विनियम, केंद्र सरकारची मंजुरी शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून [२] अंमलात येतील.

**२. प्रयुक्ती -** हे विनियम, या मंडळातील वर्ग एक चे पद धारण करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला लागू होतील, परंतु अशी कोणतीही व्यक्ती जर अर्धवेळ नोकरीत असेल किंवा ती केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा इतर आस्थापनेतून प्रतिनियुक्तीवर असेल तर, अशा व्यक्तीस हे नियम, लागू होणार नाहीत.

३. **व्याख्या -** या विनियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) " मंडळ " आणि " अध्यक्ष " या संज्ञांना, मुख्य बंदर विश्वस्त मंडळ अधिनियम, १९६३ यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ देण्यात आले तेच आहेत.

(ब) " वर्ग एकचे पद " याचा अर्थ, असे पद, ज्या पदावरील व्यक्तीस, कमाल रू. १,१०० किंवा त्यापेक्षा अधिक वेतन किंवा वेतनश्रेणी असेल असा आहे.

---

१. मंडळाद्वारे टी. आर. क्रमांक ६१६, दिनांक ११.११.१९७५ द्वारे आणि केंद्र सरकारद्वारे एमओएसटीचे पत्र क्रमांक पीईबी (८६)/७५, दिनांक ८ जानेवारी १७७६ अन्वये मंजूर करण्यात आले.

२. १५ जानेवारी १९७६ पासून कार्यान्वित (अंमलात)

(क) " वाणिज्यिक नोकरी " याचा अर्थ-

(एक) कोणत्याही अधिकाराची नोकरी, यामध्ये वाणिज्यिक, औद्योगिक, वित्तिय किंवा व्यावसायिक कामात गुंतलेल्या, एख्याद्या कंपनीच्या, सहकारी संस्थेच्या, भागीदारी संस्थेच्या किंवा एखाद्या व्यक्तीच्या अभिकर्त्याचा किंवा सार्वजनिक बांधकामाकरिता असलेल्या कंत्राटदाराचा किंवा सार्वजनिक बांधकामाशी संबंधित असलेला कंत्राटदार किंवा अशा कंत्राटदाराचा कर्मचारी यांचा समावेश आहे आणि तसेच अशा कंपनीचे संचालक पद आणि भागीदारी संस्थेची भागीदारी यांचादेखील समावेश आहे, परंतु यामध्ये केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्या संपूर्णत:किंवा वस्तुत: मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या नियम निकायातील नोकरीचा समावेश होत नाही,

(दोन) स्वतंत्रपणे किंवा एखाद्या भागीदारी संस्थेचा भागीदार, सल्लागार किंवा समंत्रक म्हणून ज्या संबंधात कर्मचाऱ्यास-

(अ) कोणतीही व्यावसायिक अर्हता नसेल अणि व्यवसाय सुरु करणे किंवा पुढे चालवणे यांसंबंधातील बाबी त्याच्या कार्यालयीन ज्ञान किवा अनुभवाशी संबंधित असतील अशा बाबतीत व्यवसाय सुरु करणे, किंवा

(ब) व्यावसायिक अर्हता असेल परंतु असा व्यवसाय सुरु करावयाच्या संबंधातील बाबी त्याच्या पूर्वीच्या कार्यालयीन पदाच्या कारणास्तव त्याच्या ग्राहकांस अनुचित लाभ करुन देण्याची शक्यता असणाऱ्या असतील, अशा बाबतीत व्यवसाय सुरु करणे, किंवा

(क) मंडळाची कार्यालये किंवा कर्मचारी यांच्याशी संपर्क अंतर्भूत असलेले काम सुरु करावे लागत असेल तर, अशा बाबतीत व्यवसाय सुरु करणे असा आहे.

**<u>स्पष्टीकरण</u>** -

या खंडाच्या प्रयोजनाकरिता, "सहकारी संस्थेतील नोकरी" यामध्ये अध्यक्ष, सभापती, व्यवस्थापन, सचिव, कोषाधयक्ष आणि तत्सम अशा एखाद्या पदावर अशा संस्थेत कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या मग ते वैकल्पिक असो किंवा नसो, काम करणे असा आहे.

(ड) "कर्मचारी" याचा अर्थ, मंडळाचा कर्मचारी असा आहे.

(ई) अंशदायी भविष्यनिर्वाह निधी योजनेद्वारे नियमन करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्याच्या संबंधातील "निवृत्तीचा दिनांक" यामध्ये भविष्यनिर्वाह निधीतील विशेष अंशदानाकरिता अर्हता प्राप्त झाल्यावर, असा कर्मचारी ज्या दिनांकास नोकरी (सेवा) सोडून देतो अशा दिनांकाचा समावेश आहे.

४.	**भारतातील वाणिज्यिक नोकरी -**

(१)	निवृत्तीलगत पूर्व, मंडळात वर्ग एकचे पद (मग ते निवृत्तीवेतन योजनेद्वारे किंवा अंशदायी निवृत्तीवेतन योजनेद्‌वारे नियमन केलेले असो) धारण करणारा कोणताही सभापतीची, अध्यक्षांची पूर्वपरवानगी प्राप्त केल्याशिवाय, निवृत्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालवधी समाप्त होण्यापूर्वी, भारतातील कोणत्याही वाणिज्यिक नोकरीचा स्वीकार करणार नाही.

(२)	अध्यक्षांची पूर्व परवानगी प्राप्त न केलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास मंडळातील कोणत्याही बांधकामाच्या संबंधातील कोणतेही कंत्राट किंवा कार्य पूर्तता करण्याची कामे देण्यात येणार नाहीत.

टीप -	जर कंत्राटदार हा स्वत: किंवा त्याचा कोणताही कर्मचारी हा अशी व्यक्ती असेल की ज्याला हे विनियम लागू होतात आणि त्याने आवश्यक परवानगी मिळवलेली नसेल तर बांधकाम कार्य रद्द करण्यात येईल अशा शर्तीचा प्रत्येक कंत्राटाच्या अटींमध्ये समावेश करण्यात येईल.

(३)	असा एखादा कर्मचारी, मग त्याचे निवृत्तीवेतन योजनेद्वारे किंवा अंशदायी भविष्यनिर्वाह निधी योजनेद्वारे नियमन करण्यात आलेले असेल, त्याच्या निवृत्ती लाभाचे प्रदान प्राधिकृत करण्यापूर्वी अध्यक्षांची पूर्वपरवानगी मिळवल्याशिवाय, त्याच्या निवृत्तीनंतर दोन वर्षांच्या कालावधीत, वाणिज्यिक नोकरी मिळणार नाही, अशा आशयाच्या वचनपत्रावर सही करील.

(४)	जर अशा एखाद्या कर्मचाऱ्याने, त्याच्या निवृत्तीच्या दोन वर्षांच्या आत, अध्यक्षांच्या पूर्वपरवानगी शिवाय वाणिज्यिक नोकरी स्विकारली तर तो-

(अ)	जर त्याचे निवृत्तीवेतन योजनेद्वारे नियमन होत असेल तर, ज्या कालवधीसाठी त्याने अशी वाणिज्यिक नोकरी स्वीकारली आहे त्या कालावधीकरिता किंवा अध्यक्ष निदेश देतील अशा मोठ्या कालावधीकरिता, त्याचे निवृतीवेतन गमावून बसेल.

(ब)	जर त्याचे अंशदायी भविष्यनिर्वाह निधी योजनेद्वारे विनियमन करण्यात येत असेल तर, त्याने पोट-विनियम (३) अन्वये दिलेल्या वचनपत्राच्या उल्लंघनासाठी, अध्यक्ष निश्चित करतील अशी नुकसानभरपाई, मंडळ प्रदान करण्यास पात्र ठरेल.

परंतु असे की, एखाद्या कर्मचाऱ्यास त्याच्या निवृत्तीपूर्व रजेच्या कालावधीत, अंतिम सेवासमाप्तिपूर्व रजेच्या कालावधीत विशिष्ट प्रकारची वाणिज्यिक नोकरी सुरु करण्यास अध्यक्षाद्वारे परवानगी देण्यात आलेली असेल किंवा ज्याने रजा नाकारली असेल, त्या कर्मचाऱ्यास, निवृत्तीनंतर अशी नोकरी सुरु ठेवण्यासाठी नव्याने परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(५) ज्याने निवृत होण्याच्या लगत पूर्वी स्थापत्य अभियांत्रिकी किंवा यंत्र अभियांत्रिकी विभागात वर्ग एकचे पद धारण केलेले असेल अशा कर्मचाऱ्याच्या बाबतीत, असा कर्मचारी अभियांत्रिकी किंवा प्रशासकीय कार्यात नियुक्त करण्यात आला आहे हे लक्षात न घेता, त्याच्या निवृत्तीच्या दोन वर्षांच्या आत, मंडळाची बांधकामे पूर्ण करण्यासाठी कंत्राटदार म्हणून किंवा त्या संबंधातील कर्मचारी म्हणून किंवा ज्याला अशा बांधकामांचे कंत्राट देण्यात आलेले असेल अशा कंत्राटदाराचा कर्मचारी म्हणून क्वचितच आणि केवळ आणि विशेष परिस्थितीतच, नोकरीकरिता परवानगी देता येईल.

(६) निवृत्तीच्या दोन वर्षांच्या आत वाणिज्यिक नोकरी सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानगी बाबतचा अर्ज, या विनियमांतील जोडपत्रात देण्यात आला आहे.

## ५. <u>पुन्हा सेवेत घेतलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत दोन वर्षांच्या कालवधीची गणना</u> -

निवृत्तीनंतर सेवेत कोणताही खंड न पडता, त्याच किंवा मंडळातील दुसऱ्या वर्ग एकच्या पदावर,एखाद्या कर्मचाऱ्यास पुन्हा सेवेत घेण्याच्या बाबतीत, असा कर्मचारी मंडळात पुन्हा सेवेत घेतले जाणे बंद होते त्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीची गणना करण्यात येईल.

## ६. <u>भारताबाहेर एखाद्या शासनात सेवानिवृत्ती नंतरची नोकरी</u> -

(१) कोणताही कर्मचारी, मग त्याचे निवृत्तीवेतन योजेनेद्वारे किंवा अंशदायी निवृत्तीवेतन निधी योजनेद्वारे विनियमन करण्यात आलेले असेल, त्याच्या निवृत्तीपूर्वी लगतपूर्व मंडळात वर्ग एकचे पद त्याने धारण केलेले असेल, तर अध्यक्षांच्या पूर्वपरवानगी खेरीज, भारताबाहेरील कोणत्याही शासनात कोणतीही नियुक्ती स्वीकारणार नाही.

(२) असा कर्मचारी, त्याचे निवृत्ती लाभ प्रदान करण्याचे प्राधिकृत करण्यापूर्वी, अध्यक्षांच्या पूर्वपरवानगी शिवाय, भारताबाहेरील कोणत्याही शासनात कोणतीही नियुक्ती मिळवण्याचा प्रयत्न करणार नाही, अशा अभिवचनपत्रावर सही करील.

(३) जर अशा एखाद्या कर्मचाऱ्याने अध्यक्षांच्या पूर्वपरवानगी शिवाय, भारताबाहेरील शासनात नियुक्ती स्वीकारली तर, तो

(अ) जर त्याचे निवृत्तीवेतन योजनेअन्वये विनियमन करण्यात येत असेल तर, अशारीतीने ज्या कालावधीकरिता त्याची निवृत्तीवेतन योजने अन्वये विनियमन करण्यात येत असेल तर, अशारीतीने ज्या कालवधीकरिता त्याची नियुक्ती झालेली असेल त्या किंवा अध्यक्ष निदेश देतील अशा मोठ्या कालावधिकरिता, निवृत्तीवेतन गमावून बसेल, आणि

(ब) जर त्याचे अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजनेअन्वये विनियमन करण्यात येत असेल तर, त्याने पोट-विनियम (२) अन्वये, देलेल्या अभिवचनपत्राच्या उल्लंघनासाठी, अध्यक्ष निश्चित करतील अशी नुकसानभरपाई मंडळास प्रदान करण्यास जबाबदार असेल.

परंतु असे की, निवृत्तीपूर्व रजेच्या कालावधीत किंवा अंतिम सेवासमाप्तिपूर्व कालवधीत किंवा नाकारलेल्या रजेच्या कालावधीत भारताबाहेरील कोणत्याही शासनामध्ये विशिष्ट प्रकारची नोकरी सुरु करण्यास, अध्यक्षांद्वारे परवानगी देण्यात आलेल्या एखाद्या कर्मचाऱ्यास, त्याच्या निवृत्ती नंतर, अशी नियुक्ती पुढे चालू ठेवण्यास नव्याने परवानगी मिळवण्याची आवश्यकता असणार नाही.

<u>स्पष्टीकरण</u> - या विनियमाच्या प्रयोजनाकरिता, "भारताबाहेरील कोणत्याही शासनातील नोकरी" या शब्दप्रयोगात भारताबाहेरील एखाद्या शासनाच्या देखरेख व नियंत्रणाखाली कार्य करणाऱ्या स्थानिक प्राधिकरण कार्य करणाऱ्या स्थानिक प्राधिकरण किंवा महामंडळ किंवा कोणतीही इतर संस्था किंवा संघटना, यांमधील नोकरी, किंवा भारत सरकार ज्याचा सदस्य नसेल अशा आंतरराष्ट्रीय संघटनेतील नोकरीचा समावेश असेल.

(४) पोटविनियम (१) अन्वये भारताबाहेरील शासनात नोकरी स्वीकारण्यासाठी एखाद्या कर्मचाऱ्यास परवानगी देण्यापूर्वी अध्यक्ष केंद्र सरकारची सहमति प्राप्त करतील.

**७. <u>वर्ग एकच्या पदावर स्थानापन्न असलेल्या कर्मचाऱ्यांकरितादेखील परवानगी आवश्यक</u> -**
निवृत्तीनंतर भारतात वाणिज्यिक नोकरी किंवा भारताबाहेरील शासनात नोकरी स्वीकारण्याकरीता, निवृत्ती लगतपूर्व अधिकार क्षमतेत वर्ग एक स्थानापन्न नात्याने काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत देखील परवानगी आवश्यक आहे.

**८. <u>स्पष्टीकरण</u> -** या विनियमांच्या स्पष्टीकरणासंबंधात जर कोणताही प्रश्न उपस्थित झाला तर, सदर बाब अध्यक्षांकडे विचाारार्थ पाठवण्यात येईल, ज्यांचा यासंबंधातील निर्णय अंतिम असेल.

**९. <u>निरसन आणि व्यावृत्ती</u> -** या विनियमांशी सुसंगत असलेले व या विनियमांचा प्रारंभ होण्याच्या लगतपूर्ण अंमलात असलेले सर्व विनियम, याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

परंतु असे की, अशारीतीने निरसित/झालेल्या विनियमान्वये देण्यात आलेला कोणताही आदेश किंवा केलेली कोणतीही कार्यवाही ही, या विनियमांशी सुसंगत तरतुदीअन्वयेच काढण्यात किंवा करण्यात आल्याचे मानले जाईल.

**जोडपत्र**

## सेवानिवृत्तीनंतर दोन वर्षांत वाणिज्यिक नोकरी स्विकारण्याबाबत अर्जाचा नमुना.

-------

(विनियम ४ चा पोटविनियम (६) पहावा)

-------

१. अर्जदाराचे नाव :

२. सेवानिवृत्तीचा दिनांक :

३. सेवानिवृत्तीलगत पूर्वीच्या पाच वर्षांत धारण केलेल्या पदाचा तपशील :

| विभाग | धारण केलेले पद<br>वेतनश्रेणी रुपये | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| (एक) | | | |
| (दोन) | | | |
| (तीन) | | | |

४. सेवानिवृत्तीलगतपूर्वी काढलेले वेतन व भत्ते :

५. सेवानिवृत्ती लाभ -

(एक) जर अंशदायी भविष्यनिर्वाह निधी योजनेद्वारे नियमन करण्यात आलेले असेल तर :

(अ) व्याजासहित मंडळाच्या सर्वसाधारण अंशदानची रक्कम :

(ब) मंडळाच्या विशेष अंशदानाची रक्कम :

(दोन) जर निवृत्तीवेतन योजनेद्वारे नियमन करण्यात आलेले असेल तर -

(अ) निवृत्तीवेतनाची रक्कम (अपेक्षित/मंजुर) (जर निवृत्तीवेतनाच्या भागाचे अंशराशीकरण करण्यात आलेले असेल तर, त्याचा तपशील नमूद करण्यात यावा) :

(ब) मृत्यु-नि-सेवानिवृत्ती उपदान (अपेक्षित/मंजूर) :

६.	प्रस्तावित नोकरीचा तपशील -

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | कंपनी / सहकारी संस्था / भागीदारी संस्था/ व्यक्तीगत नियोक्ता, याचे नाव व पत्ता | : | |
| (ब) | मंडळातील नियुक्तीच्या कालावधीत, अर्जदाराचे कंपनी / सहकारी संस्था / भागीदारी संस्था / व्यक्तिगत नियोक्ता, यांच्याशी कोणतेही व्यवहार झालेले होते काय? जर तसे असेल तर, अशा व्यवहारांचा कालावधी व स्वरूप. | : | |
| (क) | देऊ केलेल्या पदाचे स्वरूप | : | |
| (ड) | पदाची जाहिरात केलेली होती काय? जर नसेल तर, पद कसे देऊ केले होते? | : | |
| (ई) | देऊ केलेल्या पदाची कर्तव्ये | : | |
| (फ) | प्रस्तावित नोकरीत, मंडळाची कार्यालये व कर्मचारी यांच्याशी संबंध किंवा संपर्क ठेवण्याच्या कामाचा समावेश आहे काय | : | |
| (ग) | देऊ केलेले मानधन | : | |
| (ह) | जर प्रस्तावित नोकरीत खाजगी व्यवसाय सुरु करण्याचा समावेश असेल तर, त्याचा तपशील | : | |

७.	कर्मचारी सादर करू इच्छित असेल, अशी कोणतीही इतर माहिती:

स्थळ :

दिनांक :

अर्जदाराची सही

## मुंबई बंदर विश्वस्तमंडळ

एक. सेवानिवृत्ती लगतपूर्व वर्ग एक पदावर काम करणारे व ज्यांचे निवृत्तीवेतन योजनेद्वारे नियमन करण्यात येते, अशा कर्मचाऱ्यांनी द्यावयाच्या अभिवचनपत्राचा नमुना.

[मुंबई बंदर विश्वस्तमंडळ वर्ग एक कर्मचारी (सेवा निवृत्ती नंतर नोकरीची स्वीकृती) विनियम, १९७५, याचे विनियम ४(१) व ६ (२) हे पहावेत.]

---

मी याद्वारे अभिवचन देतो की,- उक्त विनियमाच्या विनियम ४ च्या खंड (१) किंवा यथास्थिती, विनियम ५ च्या खंड (१) यांद्वारे, अध्यक्ष, मुंबई बंदर विश्वस्तमंडळ, यांच्या पूर्वपरवानगीशिवाय,

(एक) मी, माझ्या सेवानिवृत्तीच्या दोन वर्षांत, भारतात, मुंबई बंदर विश्वस्तमंडळ वर्ग एक कर्मचारी (सेवा निवृत्तीनंतर नोकरीची स्वीकृती) विनियम, १९७५ (या पुढे उक्त विनियम असा निर्देश करण्यात येईल) याच्या विनियम ३ च्या खंड (क) यात व्याख्या केल्याप्रमाणे वाणिज्यिक नोकरी स्वीकारणार नाही, किंवा

(दोन) मी, सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही वेळी, भारताबाहेरील कोणत्याही शासनात, कोणतीही नोकरी स्वीकारणार नाही.

२. मी असे समजतो की, उपरोल्लेखित अभिवचनपत्रासंबंधात माझ्याकडून उल्लंघन झाल्याच्या प्रसंगी, मला ज्यारीतीने नियुक्त केलेले आहे त्या कालावधीच्या, किंवा अध्यक्ष निदेशित करतील अशा मोठ्या कालावधीच्या संदर्भात, उक्त विनियमांच्या तरतुदींनुसार, माझ्या निवृत्तीवेतनाचे समपहरण होण्यास, मी पात्र ठरेन.

सही ____________________

नाव ____________________

स्थळ ____________________ पदनाम ____________________

दिनांक ____________________ विभाग ____________________

## मुंबई बंदर विश्वस्तमंडळ

दोन. सेवानिवृत्ती लगतपूर्व वर्ग एक पदावर काम करणारे व ज्यांचे अंशदायी भविष्यनिर्वाह निधी योजनेद्वारे नियमन करण्यात येते, अशा कर्मचाऱ्यांनी द्यावयाच्या अभिवचनपत्राचा नमुना.

[मुंबई बंदर विश्वस्तमंडळ वर्ग एक कर्मचारी (निवृत्तीनंतर नोकरीची स्वीकृती) विनियम, १९७५ याचे विनियम ४(१) व ६(२) हे पहावेत.]

---

मी याद्वारे अभिवचन देतो की _____उक्त विनियमाच्या विनियम ४ च्या खंड (१) किंवा, यथास्थिती, विनियम ५ च्या खंड (१) यांद्वारे, अध्यक्ष, मुंबई बंदर विश्वस्तमंडळ यांच्या पूर्वपरवानगीशिवाय

(एक) मी, माझ्या निवृत्तीच्या दोन वर्षांत भारतात, मुंबई बंदर विश्वस्तमंडळ वर्ग एक कर्मचारी (निवृत्तीनंतर नोकरीची स्वीकृती) विनियम, १९७५ (यापुढे उक्त विनियम असा निर्देश करण्यात येईल) याच्या विनियम ३ च्या खंड (क) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे वाणिज्यिक नोकरी स्वीकारणार नाही, किंवा

(दोन) मी, सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही वेळी भारताबाहेरील कोणत्याही शासनातील, कोणतीही नोकरी स्वीकारणार नाही.

२. मी असे समजतो की, उपरोल्लेखित अभिवचनपत्रासंबंधात माझ्याकडून उल्लंघन झाल्याच्या प्रसंगी, उक्त विनियमांच्या तरतुदींनुसार, अध्यक्ष, मुंबई बंदर विश्वस्तमंडळ निश्चित करतील अशी नुकसानभरपाई मुंबई बंदर विश्वस्तमंडळाला प्रदान करण्यास मी जबाबदार असेन.

सही ____________________

नाव ____________________

स्थळ __________________ पदनाम __________________

दिनांक __________________ विभाग __________________

C6/pss/Regulations (Marathi & Hindi)/employment after retirement Regulations, 1975